# विद्या प्रतिष्ठानचे
# मगरपट्टा सिटी पब्लिक स्कूल,पुणे ४११ ०१३
# नर्सरी प्रवेश जून २०१८
# मगरपट्टासिटीतील मालमत्ता धारकांसाठी शालेय प्रवेश

१) सदर नोटीस केवळ नर्सरी प्रवेशासाठीच आहे. एल.के. जी ते इ. सातवीच्या प्रवेशाचा विचार दिनांक १०.०५.२०१८ रोजी करण्यात येईल. जर जागा शिल्लक असतील तरच प्रवेश देण्यात येईल.

२) आय.सी एस.ई वर्गात केवळ ४५ विदयार्थी संख्या असणे बंधनकारक आहे. पूर्व प्राथमिक विभागातील एकूण प्रवेशसंख्या १३५ (एकशे पस्तीस) आहे. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकारानुसार राखीव जागांची संख्या ३४ आहे. (२५% – १३५).

३) मगरपट्टासिटीतील प्रॉपर्टी ओनरला (मालमत्ता मालक) शालेय प्रवेशाच्यावेळी प्राधान्य देण्यात येते कारण प्रत्येक प्रॉपर्टी ओनरने (मालमत्ता मालक) विकास व देखभालीसाठी मगरपट्टा टाऊनशिप डेव्हलपमेंट अॅन्ड कन्सट्रक्शन कंपनीला आर्थिक दृष्टया योगदान दिले आहे. शाळा प्रॉपर्टी ओनरच्या (मालमत्ता मालक) फायदयासाठी एक सुविधाच आहे.

४) दिनांक २७.०१.२०१८ रोजी सकाळी १०:३० ते १:३० या वेळेत बालवाडी (नर्सरी) प्रवेशाची नावनोंदणी मुख्य शाळेत होईल. त्यानंतर सोमवार दिनांक २९.०१.२०१८ रोजी स. ४:३० ते ५:३० यावेळेत करण्यात येईल. नावनोंदणी शुल्क १०० रू असून हे शुल्क परत केले जाणार नाही. ८५ जागा मालमत्ता धारकांसाठी असतील. (४५ जागा प्रॉपर्टी ओनर ज्याचे पाल्य आधीपासूनच शाळेत शिकत आहेत आणि उरलेल्या ४० जागा पहिल्यांदा बालवाडी प्रवेशासाठी अर्ज दाखल करत आहेत व जे मगरपट्टासिटी मध्ये प्रॉपर्टी ओनर असतील याच्याकरता राखीव असतील. मगरपट्टासिटीतील ज्येष्ठ नागरिक स्वतः फ्लॅटधारक आहेत परंतु नातू अथवा नात त्यांच्यासोबत राहत नसतील तर त्यांना शाळेत प्रवेश देता येणार नाही.)
नर्सरी प्रवेशासाठी नावनोंदणी केलेल्या पाल्यांचा लकी ड्रॉ, (आर.टी.ई. अधिकार अधिनियम २००९ नुसार) गुरूवार दिनांक ०१. ०२. २०१८ रोजी संध्याकाळी ४:३० वाजता शाळेच्या मुख्य कार्यालयात होईल.

५) नर्सरी प्रवेशासाठी उपलब्ध असणाऱ्या जागांची एकूण संख्या १३५ असून खालीलप्रमाणे संख्येची विभागणी असेल.

| | | |
|---|---|---|
| अ) | शासनाच्या आर.टी.ई. कायदयांतर्गत राखीव जागा | ३४ |
| ब) | मालमत्ताधारकांसाठी एकूण जागा | ८५ |
| क) | राखीव जागाः एमटीडीसीसी.लि च्या शेअर धारकांसाठी, शाळेत शिकवणाऱ्या शिक्षकांच्या पाल्यासाठी तसेच बदली होऊन आलेल्या क्रेंद्रिय व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या पाल्यासाठी, विद्या प्रतिष्ठानच्या इतर शाळेतून बदली होऊन आलेले विद्यार्थी. वरील सर्व प्रवेशाचे अधिकार मॅनेजमेंटकडे राखीव असतील. | १६ |
| | एकूण जागा | १३५ |

६) अ) बालवाडी प्रवेशाकरता दि. ३०.०९.२०१८ पर्यत पाल्यांचे वय ३ वर्ष असावे. (विद्यार्थ्याचा जन्म ३०.०९. २०१४ ते ३०.०९ २०१५ या दरम्यानचा असावा)
ब) विशेष वैदयकीय गरज असणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देऊ शकत नाही कारण त्यांना विशेष शाळा व शिक्षकांची आवश्यकता असते.

...2

(७) नाव नोंदणीच्या वेळी लागणारे कागदपत्र :

अ) पालकांचे व पाल्यांचे आधारकार्ड

ब) बालवाडीच्या (नर्सरी) प्रवेशाकरता मगरपट्टा ॲड्मिनीस्ट्रेटीव आणि सेक्युरिटी डिपार्टमेंट यांचे ओनरशिप सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे.

क) पाल्याचे मूळ जन्मप्रमाणपत्र

ड) बालवाडी प्रवेशाकरता वार्षिक शुल्क

| | | |
|---|---|---|
| १) | प्रवेश शुल्क | रू १,०००.०० |
| २) | वार्षिक टयुशन शुल्क | रू ४५,९००.०० |
| ३) | सहामाही शुल्क | रू ६,७००.०० |
| ४) | पालकांसाठी पीटीए शुल्क | रू ५०.०० |
| | एकूण शुल्क | रू ५३,६५०.०० |

वरील शुल्काव्यतीरिक्त पालकांना अवधान राशी रू १०,०००/— (Caution Money) भरावी लागेल. सदर शुल्क व्याजमुक्त असेल. विद्यार्थी जेव्हा शाळा सोडेल तेव्हा अवधान राशी परत देण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १) | एकूण शुल्क | रू ५३,६५०.०० |
| २) | अवधान राशी | रू १०,०००.०० |
| | एकूण शुल्क | रू ६३,६५०.०० |

बालवाडीचे एकूण शुल्क एकदम भरावयाचे आहे. शुल्क डि.डि. द्वारे V P Magarpatta City Public School च्या नावे जमा करावयाचे आहे.
वरील शुल्कात गणवेष, स्वेटर, बूट, पुस्तके, वहया व इतर शालेय साहित्याचा समावेश करण्यात आलेला नाही.

**वरील शुल्क लकी ड्रॉ झाल्यानंतरच भरवयाचे आहे.**

ई) बालवाडी प्रवेशा संदर्भात शाळेचे सेक्रेटरी गव्हर्निग बॉडी यांच्यांशी ४:३० ते ५:३० या वेळेत २६८९८२५६ या क्रमांकावर संपर्क करू शकता. कृपया इ.मेल पाठवू नयेत.

फ) बालवाडी प्रवेशासाठी कृपया कार्यालयीन कर्मचा यांना विचारणा करू नये. त्यांना सक्त सूचना देण्यात आली आहे की प्रवेशा संदर्भात कोणत्याही प्रकारच्या शंकाचे निरसन करू नये.

टी टी बरोज

०८.०१.२०१८

टी. टी. बरोज
सेक्रेटरी गव्हर्निग बॉडी